**तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव (महाराष्ट्र शासन अंगीकृत) यांच्या प्रस्तावित निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, ता. अमळनेर, जि. जळगांव (हतनुर कालवा विभाग, चोपडा, ता. चोपडा, जि. जळगांव) या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनहित जाहीर लोकसुनावणी दि.१३/०७/२०१२ रोजी सकाळी ११ वाजता मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली मुकेशभाई पटेल मेमोरीयल हॉल करवंद नाक्याजवळ, शहादा रोड, शिरपुर, जि.धुळे येथे आयोजित केली होती. त्याचे इतिवृत्त खालीलप्रमाणे:-**

या जनहित जाहीर लोकसुनावणीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) **श्री. प्रकाश महाजन**
जिल्हादंडाधिकारी,धुळे. **:अध्यक्ष**

२) **श्री. अ. सो. फुलसे**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ,नाशिक. **:सदस्य**

३) **श्री. बा. म. कुकडे**
उप-प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ,जळगांव-२. **:समन्वयक**

समितीचे समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी श्री. बाबासाहेब कुकडे यांनी समितीचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने लोक सुनावणीच्या कामकाजाची सुरूवात केली. त्यांनी सांगितले की, वन व पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांच्या दि. १४/९/२००६ च्या अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या यादी मधील प्रकल्पांना प्रकल्प चालू करण्यापूर्वी, विस्तारीकरण करण्यापूर्वी पर्यावरणीय अनुमती (Environmental clearance) घेणे बंधन कारक केलेले आहे.

श्री. कुकडे यांनी पुढे सांगितले की, जनहित जाहीर लोकसुनावणी घेण्यामागचा उद्देश असा आहे की, एखादया ठिकाणी येणा-या प्रस्तावित उद्योगाबाबत प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणा-या संस्था, विस्थपित होणारे रहिवाशी किंवा अन्यप्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांनी प्रस्तावित प्रकल्पासंबंधीत सुचना, टिका, टिपण किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात निसंकोचपणे नोंदवाव्यात जेणे करून प्रस्तावित प्रकल्पाला पर्यावरणीय अनुमती (Environmental clearance) देणे पूर्वी सदर बाबींचा विचार होईल.

पुढे त्यांनी सांगितले की, लोक सुनावणीच्या राजपत्रानुसार लोकसुनावणीच्या एक महिना अगोदर स्थानिक वर्तमान पत्रामध्ये (मराठी व इंग्रजी) दि.१२/०६/२०१२ रोजी दैनिक लोकमत व लोकमत टाईम्स या वर्तमान पत्रांमध्ये जाहीर सुचना देण्यात आलेली होती.सदर जाहीर सूचनेमध्ये प्रस्तावित निम्न तापी प्रकल्प, पाडळसे ता. अमळनेर जि. जळगांव (हतनुर कालवा विभाग चोपडा ता. जळगांव ) क्षेत्रामधील सर्वसाधारण जनतेस आपले आक्षेप / मते असतील तर ते मांडण्याकरीता जाहीर आव्हान करण्यात आलेले होते. तसेच प्रकल्पाविषयीचे पर्यावरणीय परिणाम अहवाल (EIA Report), मराठी व इंग्रजी मध्ये टिपणी, सी. डी. ही कागदपत्रे सर्वसाधारण जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जिल्हापरिषद कार्यालय धुळे, ग्राम पंचायत अजंदे, भावेर, नांथे, पिळोदे, घोडसगांव, पिंपळे तांडा ता. शिरपुर जि. धुळे, जिल्हाउद्योग केंद्र धुळे, तहसिलदार कार्यालय धुळे व शिरपुर, पर्यावरण विभाग मंत्रालय मुंबई, म.प्र.नि. मंडळ मुख्यालय मुंबई, प्रादेशिक कार्यालय म.प्र. नि. नाशिक व उप-प्रादेशिक कार्यालय जळगांव-२. याठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

त्यानंतर श्री कुकडे यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना विनंती केली त्यांनी सदरील निम्न तापी प्रकल्प, पाडळसे ता. अमळनेर जि. जळगांव (हतनुर कालवा विभाग चोपडा ता. जळगांव ) प्रस्तावित प्रकल्पाबाबत मराठीमध्ये थोडक्यात माहिती सांगावी जेणे करून उपस्थित असलेल्या सर्व रहिवाश्यांना, ग्रामस्थांना प्रकल्पाची माहिती तसेच पर्यावरण विषयक कोणकोणत्या बाबीं विचारात घेतलेल्या आहेत त्याचे ज्ञान होईल. तसेच त्यांनी उपस्थित असलेल्या सर्व जनतेस विनंती केली की, प्रकल्पाबाबत माहिती सांगितल्यानंतर पर्यावरणविषयक काही सुचना आक्षेप असतील तर त्या शांतपणे मांडाव्यात.

त्यानंतर प्रकल्पाचे प्रतिनिधी श्री. अनिल सुर्यवंशी सहाय्यक अभियंता व श्री उज्वल पाटील,सल्लागार मे. ग्रीनसीइंडिया प्रा. लि., गाझीयाबाद, यांनी निम्न तापी प्रकल्प, पाडळसे ता. अमळनेर जि. जळगांव (हतनुर कालवा विभाग चोपडा ता. जळगांव ) च्या प्रकल्पाबाबत प्रस्तावना सांगितली व त्यानंतर प्रकल्पाविषयी पॉवर पाईंट पेझेंटेशन सादर केले. यामध्ये प्रकल्पाची पार्श्वभूमी प्रकल्पाचे विवरण, प्रस्तावित प्रकल्पाचे स्थान दाखवणारा नकाशा व त्याचे जवळील गावापासुनचे अंतर, मुलभुत पर्यावरणाची स्थिती, हवा, पाणी, ध्वनी, मृदा, इत्यादी तपासणीचे नमुने व त्याचे मापदंड, प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे प्रभाव, पर्यावरण आयोजन व आराखडा, पर्यावरणीय प्रबंधन योजना, सामाजिक-आर्थिक दृष्टीकोन व निष्कर्ष इ, विषयी विस्तृत माहितीचे सादरीकरण केले.

समितीचे समन्वयक यांनी उपस्थितांना आव्हान केले की त्यांनी आपले प्रश्न,सूचना,आक्षेप नोंदविण्याअगोदर स्वतचे नांव व गांव सांगावे.

सदरील पर्यावरण लोकसुनावणी मध्ये उपस्थित असलेल्या नागरीकापैकी काही नागरीकांनी प्रकल्पाबाबत आक्षेप/ सुचना उपस्थित केल्या व त्यांना प्रकल्प प्रतिनिधींकडून उत्तर देण्यात आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री. पाटील, रहिवाशी अजंदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्न :** पूर्णतः व अंशतः किती गावे बाधित होणार आहेत ?

**उत्तर :** प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, सदरील प्रकल्प दोन टप्प्यात पुर्ण करण्यात येणार असून.अंशतःबाधित ९ गावे व पूर्णतः बाधित ८ गावे होणार आहेत. खालील प्रमाणे.

अशंतः बाधित गावे - होळ, अजंदे, घाडवेल, विटनेर, बुधगांव, बोहरा, कलाली, नांदेड व अनर्वेदे, पुर्णतः बाधित - पाडळसे, डांगरी, सातरी, धुपे, विंचखेडे, वाळकी, शेंदणी व नांथे.

२) **श्री. ईश्वर पाटील, पिळोदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्न :**माझे गाव पिळोदा हे बाधीत गांव आहे का ?

**उत्तर :**प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, पिळोदा हे गांव या प्रकल्पात बाधीत होत नाही.

३) **श्री. डॉ. डी. बी. पाटील, सरपंच, होळ ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्न :**आपण या लोकसुनावणीसाठी बहुतेक गावांना प्रकल्पाविषयी माहिती दिली होती, पण आमच्या होळ या गावाला माहिती का पाठवली गेली नाही ? प्रस्तावित प्रकल्पाबाबत आमच्या गावात फार गैरसमज पसरलेला आहे.

**उत्तर :**प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, या लोकसुनावणी संदर्भात एक महिना अगोदर मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा तर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच टप्पा एक नुसार ज्या गावांची शेतजमिन किंवा घरे बुडीत क्षेत्रात येणार आहेत त्या गावांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे पत्राव्दारे कळविण्यात आले होते.तसेच जाहिर सूचनेमध्ये कोणास काही आक्षेप,सूचना किंवा प्रश्न मांडवयाचे असतील तर ते लेखी स्वरूपात किंवा जाहिर सूनावणी दिवशी नोंदवावेत असे आव्हान केले होते.

श्री. अ. सो. फुलसे ,सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,नाशिक यांनी प्रकल्प प्रयोजकांना सांगितले कि,आपण तसे संबंधितांना कळविण्यास आवश्यक होते. याबाबत काळजी घेण्यात यावी.

४) **श्री. ॲड. गोपाळराव राजपूत,अजंदे ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्न :** प्रकल्पाची सद्यःस्थिती काय आहे ? अगोदर प्रकल्प सुरु करता व नंतर सुनावणी घेता हे चुकीचे आहे.आपण सुरवातीस लोक सूनावणी ठेवावयास हवी होती.

**उत्तर :** श्री. अ. सो. फुलसे ,सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी असे सांगितले की, वन व पर्यावरण मंत्रालयाच्या १९९४ च्या अधिसूचनेमध्ये फक्त मोठया सिंचन प्रकल्पांना पर्यावरण मान्यता (Environmental Clearance) व जनहित जाहिर लोकसूनावणी घेणे आवश्यक होते परंतू सदर अधिसूचनेमध्ये २००६ मध्ये सूधारणा करून त्यामध्ये दहा हजारपेक्षा जास्त हेक्टर भागाला सिंचन प्रकल्पामूळे लाभ होणार आहे अशा प्रकल्पांना वने व पर्यावरण मंत्रालय नवी दिल्ली यांची पर्यावरण मान्यता (Environmental Clearance) व जनहित जाहिरलोकसूनावणी घेणे बंधनकारक केले आहे त्यामूळे प्रकल्पाची सूरवात जरी १९९४ साली झाली असली तरी अधिसुचना नंतरची असल्यामुळे ही सुनावणी आज होत आहे.

५) **श्री. ॲड. गोपाळराव राजपूत,अजंदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्न :** माझे गांव अजंदे बुद्रुक हे अंशतः बाधित आहे व तसेच आजच आमच्या गावातील भूगर्भीय पाण्याची पातळी ही वरती आहे, त्यामूळे हा प्रकल्प पूर्ण झाला तर आमच्या घरांना बाधा होईल का, दलदल निर्माण होईल का ? या गावाचे पुनर्वसन होईल का ?

**उत्तरः-**प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, टप्पा १ नुसार अजंदे हे गाव बाधीत होत नसून ते टप्पा २ मध्ये बाधीत होते. आम्हाला एकूण १७ गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे, त्यानुसार टप्प्या-टप्प्याने व प्राधान्यक्रमानुसार प्रत्येक गावाचे पुनर्वसन बाधीतांना विश्वासात घेऊनच, तसेच शासकीय अटी व शर्तीनुसारच पुर्ण करण्यात येईल.

६) **श्री. ॲड. गोपाळराव राजपूत, अजंदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्नः** परंतु अगोदर आमच्या पुनर्वसनाचे काय ?

**उत्तरः-** प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, सर्व गावांचे पुनर्वसन झाल्याशिवाय आम्ही कुठल्याही परिस्थितीत पाणी अडवणार नाही, हा तर शासनाचा नियमच आहे.

**७) श्री. ॲड. गोपाळराव राजपूत, अजंदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्नः** मी आज लेखी निवेदनाव्दारे आपणास,जिल्हाधिकारी, धूळे व उप-प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ,जळगांव-२ यांच्याकडे आमचे म्हणणे सादर करोत आहोत.आपण अगोदर आमचे प्रश्न सोडवावेत तोपर्यंत आमचा प्रकल्पाला विरोध असेल.

**उत्तरः-** श्री.बा. म. कुकडे, उप-प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ,जळगांव-२ यांनी सांगितले कि आपल्या निवेदनाची नोंद घेण्यात आली असून ते विचारात घेतल जाईल.

**८) श्री. ॲड. गोपाळराव राजपूत, अजंदे, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्नः** शिरपूर तालूक्याला या प्रकल्पामूळे कोणताही लाभ होणार नाही तरी आम्ही आपणास सहकार्य करीत आहोत,परंतू अगोदर आमच्या पुनर्वसनाचे काय ?

**उत्तरः-** प्रकल्प प्रतिनिधींनी असे सांगितले की, सर्व गावांचे पुनर्वसन झाल्याशिवाय आम्ही कुठल्याही परिस्थित पाणी अडविणार नाही. प्रकल्प प्रतिनिधींनी श्री. अमृतकर यांनी सांगितले की, प्रकल्पाबाधित गावाच्या शेवटच्या घरापर्यंत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत धरणाचे गेट टाकण्यात येत नाही हा शासनाचा नियम आहे.

**९) श्री. विलास पाटील, पिळोदा, ता. शिरपूर जि.धूळे**

**प्रश्नः** पिळोदा गावाचे नवीन सर्वेक्षण करण्यात यावे ?

**उत्तरः-** मा. बाळासाहेब वाघचौरे, उपविभागिय अधिकारी, शिरपुर. यांनी असे सांगितले की, आपल्या मागण्या रास्त आहेत, आपल्या मनात प्रकल्पा विषयी भिती आहे, त्यामुळेच हा प्रश्न निर्माण झाला आहे. आपण गावात जाऊन सयुंक्तपणे सर्वेक्षणाअंती योग्य त्या निर्णयासाठी शासनास शिफारस करु. प्रकल्प प्रायोजकांना अशी सूचना करण्यात येते की, शिरपूर तालूक्याला या प्रकल्पामूळे कोणताही लाभ होणार नाही तरी आपणास सहकार्य करीत आहेत,तरी पुनर्वसनाबाबत त्यांचे काही प्रश्न असतील तर ते सोडवण्यास प्राधान्य दयावे.

शेवटी मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी, धुळे यांनी असे सांगितले की, या प्रकल्पाचे दोन टप्पे करण्यात

आले आहेत. या प्रकल्पामुळे पर्यावरणास कोणतीही बाधा निर्माण होणार नाही उलट प्रकल्पामुळे सभोवतालच्या परिसरातील भूगर्भीय पाण्याच्या पातळीत वाढच होईल व त्याचा फायदा सर्वांनाच होणार आहे. या दृष्टीनेच शासन प्रयत्न करित असते. सद्य:स्थितीत पावसाच्या पाण्याची अनियमितता व भविष्यातील पाण्याची मागणी लक्षात घेता आपल्याला पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करावे लागणार आहे. हे आपल्या सहकार्याने व सहभागानेच शक्य होणार आहे. या प्रकल्पामुळे भविष्यात धुळे व जळगांव जिल्हयांना सिंचनासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी भरपुर फायदा होईल. पुनर्वसनासंदर्भातील कुठलेही काम हे बाधीतांना विश्वासात घेऊनच पुर्ण करण्यात येईल याची पूर्णपणे काळजी घेण्यात येईल.

श्री.लिंगडे, क्षेत्र अधिकारी, उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जळगांव-२ यांनी उपस्थितांचे आभार मानून जनजाहिर सूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने जनजाहिर सूनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(बा. म. कुकडे)**
समन्वयक,
पर्यावरण विषयक जाहिर
लोकसुनावणी तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जळगांव

**(अ.सी.फुलसे)**
सदस्य पर्यावरण विषयक
जाहिर लोकसुनावणी तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, नाशिक

**(प्रकाश महाजन)**
अध्यक्ष पर्यावरण विषयक
जाहिर लोकसुनावणी
तथा जिल्हाधिकारी, धुळे

**Minutes of the Environmental Public Hearing Conducted on 13/07/2012 at 11.00 hours at Mukeshbhai Patel Memorial Hall, Near Karvand Naka,Shahada Road, Shirpur, Dist-Dhule. for Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon Govt. of Maharashtra, for their proposed Lower Tapi Project, Padalse, Tal. Amalner, Dist. Jalgaon (Hatnur Canal Division, Chopda, Tal. Chopda, Dist. Jalgaon)** Following members were present during the public hearing.

1. Shri.Prakash Mahajan
   District Magistrate, Dhule : Chairman

2. Mr. A. S. Fulse
   Regional Officer, MPCB Nashik : Member

3. Mr.B.M. Kukade
   Sub-Regional Officer Jalgaon-2 : Convener

Shri. Kukade, Convener of the meeting, welcomed the Chairman of the Committee, Panel Member, Tapi Irrigation Corporation Officials and public who were present and requested the Chairman of the Committee to give consent for the proceedings of the meeting and accordingly the Chairman granted the concurrence to start the public hearing proceedings. Shri. Kukade informed that as per the Government Resolution of Govt. of India S.O. 1533 dated 14th September, 2006, Public Hearing has become mandatory for the listed projects to obtain Environmental Clearance from Ministry of Environment, Govt. of India, New Delhi.

Shri Kukade, further informed that basic theme of the public hearing is that general public who are going to be affected by the project have been given an opportunity to put up their objections/ suggestions from pollution and environmental safety point of view to the Govt. for its consideration while granting permission/ Environment Clearance.

He informed that as per the Notification of the Public Hearing, one month in advance Public Notice was published in Daily Lokamt & Lokmat Times, local News Paper in Marathi and as well as in English respectively on dated 12th Jun 2012. The public in general were appealed to raise their objections / suggestion if any for proposed Lower Tapi Project, Padalse, Tal. Amalner, Dist. Jalgaon (Hatnur Canal Division, Chopda, Tal. Chopda, Dist. Jalgaon). Further, he informed that, the

necessary documents were made available for the general public at Collector Office Dhule, Zilla Parishad Office Dhule, Tahsil Office Dhule & Shirpur, Grampanchayat Office of Village Ajande,Bhaver, Nanthe, Pilode, Ghodasgaon & Pimpaletanda Tal. Shirpur, Dist. Dhule, District Industries Center Dhule, Environment Department (GOM) Mumbai, MPCB Head Office Mumbai, Regional Office MPCB Nashik and Sub Regional Office MPCB Jalgaon II.

Shri Kukade the convener asked Tapi Irrigation Project Officials to explain in brief about proposed project & the efforts to be taken to Control the Pollution in local language i.e. in Marathi, so that the common people who are attending hearing can be satisfied. He also appealed local people to raise the suggestion / queries objections if any regarding the pollution aspects of this proposed project.

After this the Project Engineer Mr. Anil Surywanshi (AE-I) and Mr. Ujjwal Patil, Consultant,Green Sea India Pvt. Ltd. Ghaziabad gave a brief Power Point presentation about the proposed project which included the introduction of project, irrigation facilities of project, pollution hazards to air, water, noise, and soil, The sociao-economics, financial aspects, standards, impact, rehabilitation and resettlement plan and biodiversity of project were also covered.

Sub-Regional Officer MPCB, Jalgaon and convener of panel requested the public to come one by one to raise their queries and give their suggestions if any.

During the course of the hearing, the public put forward their suggestions and objections regarding the proposed project are as under.

1. **Mr. Patil, Resident Ajande , Tal. Shirpur, Dist. Dhule.**

   **Que**: May I know how many villages are wholly and partially affected by this project?

   **Ans:** The Project Engineer: The project will be executed in two stages. Accordingly 9 Villages are partially affected and 8 villages are wholly affected.Partly affected villages are Hol, Ajande, Ghadwel, Vitner,Budhgaon, Bohra, Kalali, Nanded & Anvarde, wholly affected villages are Padalse, Dangri, Satri, Dhupe, Vichkhede, Walki, Shendane & Nanthe.

2. **Mr. Ishwar Patil, Pilode, Tal. Shirpur, Dist. Dhule.**

   **Que** : Is my Village Pilode one of the affected village?

   **Ans:** The Project Engineer: Pilode village is not affected due to this project.

3. **Dr.D.B.Patil, Sarpanch Hol Village, Tal. Shirpur, Dist. Dhule.**

   **Que**: You had sent the list of affected villages, why did our village Hol not receive this information. In my Village some mis understanding is spread due to this project?

   **Ans:** The Project Engineer: He informed that MPCB had published advertised about this hearing in Marathi and English regional news papers one month earlier. MPCB informed only those villages which are affected in stage-1. Also in advertisement appeals that, if any one has any objection/Suggestion regarding public hearing may raise orally/written suggestions, questions prior to the public hearing or on the day of public hearing.

   **Shri.** A.S.Fulse, Member of public hearing panel committee & Regional officer, M.P.C.Board, Nashik.- He asked the project proponent that you should inform to these to all affected villages also and also instructed that in future care should be taken.

4. **Adv. Gopalrao Rajput, Ajande, Tal. Shirpur, Dist. Dhule.**

   **Que:** What is the current status of this project? Why have you first started the project and then take the hearing is this is not wrong?

   **Ans:** Shri. A.S.Fulse, Member of public Hearing Committee & Regional Officer M.P.C.Board, Nashik: He informed that according to Ministry of Environment & Forest Notification 1994 only Major Irrigation project was included for obtaining Environmental clearance & conducted Public Hearing, But as per Amended Notification in 2006 if culturable Command area of the project more than ten thousand hectares such projects require Environmental Clearance and Public Hearing. Though the project started in 1994 Notification publishes after this due to which Public Hearing is conducted for this project.

5. **Adv. Gopalrao Rajput,Ajande, Tal. Shirpur, Dist. Dhule.**
**Que:** My village Ajande is partially affected and at present water table is already high,if project completed houses get affected, will Soggy develop? Rehabilitation of Village done?
**Ans:** The Project Engineer: He informed that in stage 1 Ajande village not affected, it will be affected in stage 2. We have to rehabilitate 17 villages. Considering the priority and stages of the project, this work will be executed according to the Government terms and conditions.

6. **Adv. Gopalrao Rajput,Ajande, Tal. Shirpur, Dist. Dhule.**
**Que** : What about our rehabilitation?
**Ans:** The Project Engineer: He explained that we will store the water after only the rehabilitation work will get completed this is as per Government circular.

7. **Adv. Gopalrao Rajput,Ajande, Tal. Shirpur, Dist. Dhule.**
**Que**: Today we have submitted our say in writing regarding this project to you, District Collector Dhule & Sub-Regional Officer M.P.C.Board, Jalgaon. We opposes to project till our demands fulfilled.
**Ans:** Shri. B.M.Kukade, Sub-Regional Officer, M.P.C.Board Jalgaon: He informed that we have taken notice of your letter & will consider accordingly.

8. **Adv. Gopalrao Rajput,Ajande, Tal. Shirpur, Dist. Dhule.**
**Que**: There is no benefit to Shirpur Tahsil by this project but we will still support to this project but what about our rehabilitations?
**Ans:** Project Engineer: He informed that we cannot store water before the rehabilitation of affected villagers. Shri. Amrutkar project representative informed that till the rehabilitation of last house of affected villages will not complete, we will not store the water in dam, this is as per Government Circular.

9. **Mr. Vilas Patil, Piloda, Tal. Shirpur, Dist. Dhule.**
**Que:** Is new survey should be undertaken in village Pilode?
**Ans**: Shri. Balasaheb Waghchoure, Sub-Divisional Officer, Shirpur-He Informed that all your objections are valid. This is a fact. There is a fear in your mind that is why this question has come up. I have instructed the Project Proponent to resurvey the

areas that might be affected. Project proponent instructed that, Shirpur Taluka will get benefit due to this project, but till peoples are going to give support to this project therefore you should give priority to solve the rehabilitation problems in Shirpur Taluka.

While concluding the Public Hearing, Mr. Prakash Mahajan, Chairman of the Public Hearing and Collector, Dhule stated that, project has been divided in to two stages. There is no impact on the environment due to this project. This project will be instrumental in raising the water table. It will be beneficial to all. Uncertainty in rainfall and future demand for water requires planning for the water management in big way. Without your participation and co-operation. This will not be possible. In future the demand for Irrigation, drinking water and industrial water for Dhule and Jalgaon district will be fulfilled by this project. Rehabilitation of the project will be completed only after taking care of all your objections.

Public Hearing was ended with vote of thanks to the chair.

18/7/2012

| | | |
|---|---|---|
| **(B.M. Kukade)**<br>**Convener & SRO**<br>**MPCB Jal-2** | **(A.S. Fulse)**<br>**Member &**<br>**RO MPCB Nasik** | **(Prakash Mahajan)**<br>**Collector, Dhule &**<br>**Chairman of the Public Hearing Panel.** |